वाचा : १) शासन निर्णय क्रमांक समय-२०१६/प्र.क्र.६२/१८(र.व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक २४ फेब्रुवारी २०२०
२) कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२०/३०८, दि २८/०२/२०२०.

जा.क्र./मनपा/मआ/स्वीस/२०२४/५८
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक : १६/०७/२०२४

उपरोक्त संदर्भ क्र. १ शासन निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरीता पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आलेला असून कार्यालयीन कामकाजाच्या वेळा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

<u>कार्यालयीन कामकाजाच्या वेळा</u>

१. सोमवार ते शुक्रवार सकाळी ०९.४५ ते सायं. ०६.१५ वाजेपर्यंतची वेळ निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच वर्ग-४ कर्मचाऱ्यांची कामकाजाची वेळ ०९.३० ते ०६.३० अशी निश्चित करण्यात आलेली आहे.
२. दुपारी ०१.३० ते ०२.०० या वेळेत अर्ध्या तासाची भोजनाची वेळ निश्चित करण्यात आलेली आहे.

माझे असे निर्दशनास आले आहे की, **महानगरपालिका व स्मार्ट सिटी** कार्यालयातील बरचसे अधिकारी/कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नाहीत, कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळत नाहीत, कार्यालयीन नियोजित बैठकीस वेळेत उपस्थित राहत नाहीत, दुपारच्या सत्रात मुख्यालय सोडतात, भोजनासाठी घरी अथवा मुख्यालयाच्या बाहेर जातात, मध्यान्होत्तर दुपारचे सत्रात विभागात वेळेवर उपस्थित राहत नाहीत ही बाब कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीकोणातून योग्य नसून कार्यालयीन कामकाजात व्यत्यय निर्माण करणारी आहे.

या आदेशान्वये **महानगरपालिका व स्मार्ट सिटी** कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना सक्त आदेशीत करण्यात येते की, दुपारी ०१.३० ते ०२.०० या वेळेत अर्ध्या तासाची भोजनाची वेळ निश्चित असल्याने आपण जेवायला घरी किंवा बाहेर न जाता जेवणाचा डब्बा सोबत आणावा आणि भोजन मुख्यालयातच करावे. जेणे करुन कार्यालयीन कामकाज सुरळीत पार पडेल. तरी सर्व संबंधीतांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. नसता प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

**जी. श्रीकांत** (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रति,
१) सर्व विभाग प्रमुख,
२) सर्व शाखा प्रमुख/वॉर्ड अधिकारी, वॉर्ड अभियंता व कर्मचारी
३) सर्व स्मार्ट सिटीतील अधिकारी/कर्मचारी
महानगरपालिका व स्मार्ट सिटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर